1

५०९५

| | |
|---|---|
| दस्ताचा प्रकार :- | खरेदीखत |
| दस्त नोंदणीचा तपशील :- | मा. दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर-०२. |
| ठशाचा युनिक नंबर :- | 2656 |
| मिळकतीचे थोडक्यात वर्णन :- | मौजेः- बेलवली, ताः-अंबरनाथ, येथील सर्व्हे क्रमांक २८अ, हिस्सा क्रमांक २/१पैकी, क्षेत्र २९९.९५ चौरस वार व ७७ चौरस मीटर ही मिळकत. |
| मोबदला रक्कम :- | १०,००,०००/- अक्षरी दहा लाख मात्र . |
| मुद्रांक खरेदीदाराचे नांव पक्षकार -१ नांव :- | श्री. राजेंद्र दशरथ चव्हाण, राः- मौजे बेलवली, बदलापुर. |
| दस्तातील दुस-या पक्षकाराचे नांव :- | श्री. सुरेश वामन जोशी व ईतर. |
| हस्ते असल्यास नांव व पत्ता :- | श्री. प्रसाद गुरूनाथ शेळके, बी/२०४, कार्तिक कॉम्प्लेक्स, बदलापुर. |
| मुद्रांक शुल्काची रक्कम :- | अक्षरी रू. साठ हजार मात्र. |
| प्राधिकृत अधिका-याची पुर्ण स्वाक्षरी व शिक्का :- | For The Nav Jeevan Co-op. Bank Ltd. Authorised Signatory |

## स्थावर बिनशेतजमिनीचे खरेदीखत.

मौजे बेलवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, येथील बिनशेत जमीन मिळकतीबाबतचे फरोक्तखत सर्व पक्षीयांमध्ये आज दिनांक २७/०७/२०११ रोजी लिहुन दिले असे.

THE NAVJEEVAN CO-OP BANK LTD
1ST FLOOR, NEAR NEW ERA HIGH SCHOOL ULHASNAGAR
भारत 07698 SPECIAL ADHESIVE JUL 29 2011
154764 12:16
Rs.0060000/-PB6566

R W Joshi
Ramesh Joshi

उहन.२
७८०७ २०११
३ २३

| | |
|---|---|
| १. सौ. रजनी राजेंद्र चव्हाण, वयः- ३४ वर्षे | ) खरेदीखत |
| २. श्री राजेंद्र दशरथ चव्हाण, वयः- ३९ वर्षे | ) लिहून घेणार |
| सर्व राहणारः- गांधीनगर, कुळगांव, बदलापुर, | ) |
| तालूकाः- अंबरनाथ, जिल्हाः- ठाणे. | ) प्रथम पक्षीय. |

ह्यांसी . . .

| | |
|---|---|
| १. श्री. सुरेश वामन जोशी, वयः- ७२ वर्षे, | ) खरेदीखत |
| २. श्री. रविंद्र वामन जोशी, वयः- ६९ वर्षे, | ) लिहून देणार |
| ३. श्री. रमेश वामन जोशी, वयः- ५९ वर्षे, | ) |
| ४. श्री. सुधीर वामन जोशी, वयः- ५५ वर्षे, | ) |
| सर्व राहणारः- बेलवली गांव, बदलापुर-पुर्व, | ) द्वितीय पक्षीय. |
| तालूकाः- अंबरनाथ, जिल्हाः- ठाणे. | ) |

<u>कारणे कायम विक्रीचे खरेदीखत लिहून देतात की,</u>

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी ता. अंबरनाथ, यांचे हददीतील तसेच कुळगांव बदलापुर नगर परीषद हद्दीतील **मौजेः- बेलवली, ताः-अंबरनाथ, जिः-ठाणे**, येथील बिनशेती मिळकत ही व्दितीय पक्षीय यांच्या मालकीची व कब्जा वहीवाटीची निम्न उल्लेखीत वर्णनाची मिळकत आहे.

| गावाचे नांव | सर्व्हे/हिस्सा क. | क्षेत्र हे. आर. प्रति | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| मौजेः- बेलवली, ता. अंबरनाथ, | २८अ/२/१पैकी | २९९.९५ चौरस वार | ०.१० पैसे |
| जि. ठाणे, | २८अ/२/१पैकी | ७७.०० चौरस मीटर | ०.१० पैसे |

Rajani Ramesh Joshi RW Joshi

उहन २
७९०९ | २०११
४ | ३२

सदर मिळकतीच्या चतुःर्सिमा खालीलप्रमाणे :

पुर्वेस :- लागून सर्व्हे कमांक २८अ, हिस्सा कमांक २/१ ची मिळकत.

पश्चिमेंस :- लागून सर्व्हे कमांक २८अ, हिस्सा कमांक २/१ ची मिळकत.

उत्तरेस :- लागून सर्व्हे कमांक २८अ, हिस्सा कमांक २/१ ची मिळकत.

दक्षिणेस :- लागून सर्व्हे कमांक २८अ, हिस्सा कमांक २/१ ची मिळकत.

येणेप्रमाणे चतुःर्सिमा असलेली मिळकत म्हणजेच सर्व्हे कमांक २८अ, हिस्सा कमांक २/१ पैकी, ही मिळकत खरेदीखत लिहून देणार यांच्या आईची मिळकत असून सदरहू मिळकतीपैकी ५०० चौरस वार एवढी मिळकत ही श्रीमती. अवंतिकाबाई वामनराव जोशी यांनी श्री. विठठ्ल महादेव सावंत यांजकडुन दिनांक १६.०२.१९७० रोजी विकत घेतलेली होती. परंतु सदरहु मिळकतीपैकी काही मिळकत ही त्यांनी अन्य ति-हाईत ईसमांना विकून टाकल्या. व मृत्युसमयी २९९.९५ चौरस वार एवढीच मिळकत ही त्यांचे नावे दाखल होती तर उर्वरीत ७७ चौरस मीटर एवढी मिळकत ही श्रीमती. अवंतिकाबाई वामनराव जोशी यांनी दिनांक २३.१०.१९९१ रोजी दस्त कमांक २०५/१९९१ रोजी विकत घेतलेली आहे. त्यांस नवीन कमांक १३६८/१९९६ हा देण्यात आलेला आहे. परंतु श्रीमती. अवंतिकाबाई जोशी या दिनांक १९.०९.२००८ रोजी मयत झाल्या असुन त्यांच्या वारसांची नावे ही सदरहू मिळकतीच्या सात बारा सदरी **फेरफार कमांक ३४५४ अ** अन्वये दाखल झालेले आहेत.

सबब द्वितीय पक्षीय यांनी दोघांनी मिळून सदरहू मिळकत ही प्रथम पक्षीय यांस विकत देण्याचे ठरविले. व प्रथम पक्षीय यांस सुद्धा रहीवासासाठी जागेची आवश्यकता असल्याकारणाने त्यांनी सदरहु मिळकत विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

RW Joshi

Rajan Ramesh Joshi

उहन [illegible]
७८०७ / २०११
५ / २२

प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांचे दोन्ही पक्षकारांचे वाटाघाटीत उपरोक्त मिळकतीची संपुर्ण किंमत रक्कम रूपये १०,००,०००/- (अक्षरी दहा लाख मात्र) ऐवढी ठरलेली आहे. व सदरची रक्कम ही प्रथम पक्षीयांनी व्दितीय पक्षीयांना खालीलप्रमाणे दिलेली आहे.

अ. रक्कम रू. ४,००,०००/- (अक्षरी चार लाख मात्र) ही रक्कम श्री. [illegible] वामन जोशी यांस दि अंबरनाथ जय हिंद को.ऑ. बॅंक लिमीटेड, बदलापुर शाखेच्या, डिमांड ड्राफट क्रमांक 066677, दिनांक २९/०७/२०११ रोजी अदा केलेल आहेत.

ब. रक्कम रू. २,००,०००/- (अक्षरी दोन लाख मात्र) ही रक्कम श्री. रविंद्र वामन जोशी यांस दि अंबरनाथ जय हिंद को.ऑ. बॅंक लिमीटेड, बदलापुर शाखेच्या, डिमांड ड्राफट क्रमांक 066674, दिनांक २९/०७/२०११ रोजी अदा केलेल आहेत.

क. रक्कम रू. २,००,०००/- (अक्षरी दोन लाख मात्र) ही रक्कम श्री. सुधीर वामन जोशी यांस दि अंबरनाथ जय हिंद को.ऑ. बॅंक लिमीटेड, बदलापुर शाखेच्या, डिमांड ड्राफट क्रमांक 066675, दिनांक २९/०७/२०११ रोजी अदा केलेल आहेत.

ड. रक्कम रू. २,००,०००/- (अक्षरी दोन लाख मात्र) ही रक्कम श्री. [illegible] वामन जोशी यांस दि अंबरनाथ जय हिंद को.ऑ. बॅंक लिमीटेड, बदलापुर शाखेच्या, डिमांड ड्राफट क्रमांक 066673 / 066676, दिनांक २९/०७/२०११ रोजी अदा केलेले आहेत.

व त्याची पावती हया करारान्वये व्दितीय पक्षीय यांनी दिलेली आहे. याप्रमाणे सदर व्यवहारापोटी व्दितीय पक्षीय यांस मान्य केलेला मोबदला संपुर्ण मिळाला आहे. प्रथम पक्षीयांकडुन आता काही येणे नाही.

R.W. Joshi

Rameshjoshi

5

| | |
|---|---|
| दु ह | २ |
| ७६०७ | २०११ |
| ६ | ३२ |

**सबब सदरचे फरोक्तखत (खरेदीखत) प्रथम पक्षाचे लाभात आज रोजी करून देत आहेंत.**

१. सदरहु मिळकत ही पुर्णपणे दोषमुक्त व बोजेरहीत असलेली मिळकत आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही स्वरूपाचा बोजा नाही. सदर मिळकत ही यापुर्वी कोठेही गहाण अथवा विक्री अथवा दान केलेली नाही. आजपर्यंत व्दितीय पक्षाने प्रथम पक्षीय यांचेखेरीज कोणासही लेखी अथवा तोंडी कराराने विकण्याचे मान्य केलेले नाही. तसेच मिळकतीवर कुठल्याही प्रकारचा टाच नाही. सदर मिळकत व तिचा कुठलाही भाग कोणत्याही प्रकारचे आरक्षण नाही. सदर मिळकतीवर कुठल्याही प्रकारचे कर, उपकर, वगैरे बाकी नाही. तसेच कोणत्याही स्वरूपाची कोणतीही थकबाकी निघाल्यास त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील. व त्या संबंधी प्रथम पक्षीयांवर तोषीस येणार नाही अशी हमी या दस्ताने व्दितीय पक्षीय लिहुन देणार यांनी दिलेली आहे.

२. सदरहु कायम फरोक्तखत/खरेदीखत प्रथम पक्षीय हे आपले नाव व्दितीय पक्षीय यांचे जागी सदर मिळकतीला महसुल दप्तरी व भुमी अभिलेख यांचे कार्यालयात नोंदविण्यास सर्वस्वी मुखत्यार आहेत. व त्यास व्दितीय पक्षीय यांचा कोणत्याही स्वरूपाचा प्रतिबंध नाही. व्दितीय पक्षीय प्रथम पक्षाचे नाव अभिलेख कार्यालयात नोंदविण्यास लागणा-या अर्जावर सहया करून जाबजबाब देउन प्रथम पक्षाचे नावावर वाढीव मोबदला न मागता करून देण्याची हमी देतात.

सदरहु मिळकतीबाबत असणारे मार्केटेबल टायटल संबंधीची माहीती व खात्री आम्ही तुम्हांस आमचे कडील सर्व कागदपत्रांनीशी करून दिलेली आहे. प्रथम पक्षीयांनी व्दितीय पक्षीय यांच्या सदरहु मिळकतीच्या मालकी हक्काविषय आपल्या वकिलांमार्फत खात्री करून घेतली आहे. सदर मिळकतीबाबत व्दितीय पक्षीय यांचे मालकी हक्क पुर्णपणे क्लिअर असुन त्यात कोणत्याही प्रकारचा वाद नाही यांची

R. W. Joshi

उहनर २
6
| | |
|---|---|
| ७८०७ | २०१९ |
| ८ | ३३ |

खात्री प्रथम पक्षीय यांनी शासकीय दप्तरी सर्व रेव्हेन्यु रेकॉर्ड काढुन व्दितीय पक्षीय यांचे मार्केटेबल टायटल क्लिअर असल्याविषयी प्रथम पक्षीय यांनी योग्य ती खात्री करून घेतली आहे.

३. सदरहु मिळकत ही बिनशेती मिळकत असून सदरहू मिळकती बाबत मा. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबरनाथ यांचे कार्यालयाकडुन मोजणी करून घेतलेली आहे. व संपुर्ण जागेचा कब्जा दिलेला आहे. आता ताब्याबाबत प्रथम पक्षीयांची कोणतीही हरकत असणार नाही.

उपरोक्त मिळकतीचा ताबा प्रथम पक्षीय यांना दिला आहे. सदरहु मिळकतीचा उपयोग व उपभोग प्रथम पक्षीय यांनी आपल्या मर्जीप्रमाणे घ्यावा व घेत जावा त्याच्या मालकी हक्कास आमचे वालीवारस यांनी कोणतेही प्रकारचे हक्क अधिकार दाखविल्यास त्याचे निवारण आम्ही म्हणजेच व्दितीय पक्ष आमचे पदर खर्चाने करून देईल. त्याची तोषीस आपणाला म्हणजेच प्रथम पक्षीय यांना लागु देणार नाही.

४. याप्रमाणे मिळकतीचा पुर्ण मोबदला मिळाल्यामुळे हया दस्ता व्दारे प्रथम पक्षीय हे आजपासुन सदर मिळकतीचे मालक झाले असुन सर्व हक्क हितसंबंधासहित सदर मिळकतीची विक्री व्दितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांना केली आहे. प्रथम पक्षीय यापुढे सदर मिळकतीचा मालक म्हणुन आपले मर्जीप्रमाणे उपभोग घेतील. व्दितीय पक्षीय स्वतः वा अन्य कोणातर्फेही प्रथम पक्षीय यांच्या मालकी हक्कावर कुठल्याही प्रकारे आक्षेप घेणार नाही. यापुढील कर, टॅक्सेस, असेसमेंट भरायची जबाबदारी प्रथम पक्षीय यांची राहील.

५. सदरहु कायम फरोक्तखत/खरेदीखत हे व्दितीय पक्षीय व त्यांच्या वालीवारसांवर संपूर्णतः बंधनकारक राहील.

RW Joshi

दु ह न २
७९०७ | २०११
८ | ३२



६. सदरहू बिनशेती मिळकत ही व्दितीय पक्षीय यांचे मालकीची असून सदरहू मिळकतीबाबत सर्व अधिकार ते खरेदीखत लिहून घेणार यांना सदरहु खरेदीखताव्दारे दिलेले आहेत.

७. व्दितीय पक्ष आपल्या स्वखुशीने व संपुर्ण अक्कल हुशारीने कुठल्याही दबावास बळी न पडता सदरहु दस्तावर आपली स्वाक्षरी करीत आहेत.

८. आज रोजी व्दितीय पक्षीय यांनी प्रत्यक्ष जागेवर जावुन चतु:सिमाच्या खुणा दाखवुन साक्षीदारांच्या समक्ष प्रथम पक्षीयांस दिला आहे. त्याबाबतची कब्जा पावती प्रथम पक्षीयांचे नावे लिहुन दिली आहे.

सदरहु मिळकत आज रोजी व्दितीय पक्षीय या प्रस्तुतच्या खरेदीखताअन्वये प्रथम पक्षीय यांना कायम खरेदीने दिली असुन सदरहु मिळकतीच्या पुर्ण ताबा व कब्जा व्दितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांना मालक या नात्याने कायम केले आहे.

९. सदरहु बिनशेतीजमीन मिळकत ही जमीन व ही प्रथम पक्षीय यांनी रेकॉर्ड ऑफ राईटला म्हणजेच सात बारा उतारा सदरी त्यांचे नावे लावुन घ्यावयाची आहेत. त्यासाठी लागणा-या सहया व जाबजबाब देण्यास व्दितीय पक्षीय हे बांधील राहतील.

१०. सदरहु जी मिळकत विकत दिलेली आहे तीचा गट बुक नकाशा सोबत जोडलेला आहे. सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे हिरव्या रंगाने अधारेखित केलेली मिळकत विकत दिलेली आहे.

११. प्रथम पक्षीयांस आज नंतर सदर बिनशेती मिळकतीचे मालक म्हणुन उपभोग घेण्याचा, बांधकाम करण्याचा, विकास करण्याचा व इतरांना तबदिल करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे व राहील.

R W Joshi

Rajan Ramesh Joshi

उ ह न २
५९०७ | २०११
८ | ३२

सदरचे खरेदीखत हे आम्ही राजीखुशीने व कोणाचेही दडपणाखाली न येता व वाचुन घेवुन लिहुन दिले असुन हे खरेदीखत हे आमचेवर व आमचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

सदरचे खरेदीखत हे आज रोजी २९ माहे जुलै सन २०११ इंग्रजी चे दिवशी लिहून दिले आहेत.

| नांव | सही/अंगठा | फोटो |
|---|---|---|
| १. सौ. रजनी राजेंद्र चव्हाण, | Rajani | |
| २. श्री राजेंद्र दशरथ चव्हाण, (खरेदीखत लिहून घेणार) | | |

| नांव | सही/अंगठा | फोटो |
|---|---|---|
| १. श्री. सुरेश वामन जोशी, | | |

R.W. Joshi

Rajani

Suresh Joshi

उहन २
५६०७ | २०११
१० | ३३

| | | |
|---|---|---|
| २. श्री. रविंद्र वामन जोशी, | RW.Joshi |  |
| ३. श्री. रमेश वामन जोशी, | Ramesh Joshi | |
| ४. श्री. सुधीर वामन जोशी,<br>(खरेदीखत लिहून देणार) | [illegible] | |

साक्षीदार:-

१. श्री. रविंद्र दशरथ चव्हाण. रविंद्र दशरथ चव्हाण

रा. श्रीनिवास, गांधीनगर, बदलापूर(प)

२. सौ. सुवासिनी सुरेश जोशी. सौ सुवासिनी सुरेश जोशी

रा. जोशी चाळ दत्तचौक, बदलापूर(प)
कोलवली